श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित

# इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको नांदेड

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**शैक्षणिक वर्ष 2024-25**

# विशेष वार्षिक शिबिर

## अंकेक्षण अहवाल

## विशेष वार्षिक शिबिर अहवाल 2024-25

# राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर

स्थळ: मोजे वरखेड, ता. नांदेड, जि. नांदेड
आयोजक संस्था: इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड
कालावधी: 26 जानेवारी 2025 ते 1 फेब्रुवारी 2025
उद्दिष्ट: ग्रामीण क्षेत्रात सामाजिक भान निर्माण करणे, स्वयंसेवकांमध्ये नेतृत्व व सेवाभाव विकसित करणे.

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको नांदेड पासून मोजे वरखेड हे गाव दहा किलोमीटर अंतरावर आहे




---

दिनांक 26 जानेवारी 2025 - प्रजासत्ताक दिन व ग्राम संवाद
सकाळचे सत्र:

*इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालयात ध्वजारोहण करून शिबिर स्थळी प्रस्थान.*



- ○ स्वयंसेवकांनी ग्रामस्थांसोबत परिपक्व संवाद साधत गावातील समस्या व सामाजिक गरजांचा अभ्यास केला.
- ○ ग्रामसभेमध्ये स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, जलसंधारण यावर चर्चा झाली.

○ ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि शिबिराबाबत सकारात्मक वातावरणाची निर्मिती.




---

वरखेड येथे स्कूल कनेक्ट रॅली काढण्यात आली त्याप्रसंगी स्वयंसेवक

NSS NATIONAL SERVICE SCHEME

दिनांक 27 जानेवारी 2025 - उद्घाटन समारंभ

- सकाळचे सत्र:




इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड (श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित) यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिराचे आयोजन मौजे वरखेड (ता. नांदेड) येथे दिनांक 26 जानेवारी 2025 ते 1 फेब्रुवारी 2025 दरम्यान आयोजन करण्यात आले. या शिबिराचा उद्घाटन समारंभ सोमवार, 27 जानेवारी 2025 रोजी सकाळी 11 वाजता मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एल. घायाळ होते. प्रमुख अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. अमोल काळे उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत वरखेडचे पोलीस पाटील श्री. सुभाष नागोराव सूर्यवंशी यांची विशेष उपस्थिती लाभली.

उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. अमोल काळे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ श्रम न करता, संस्कार, नीतिमत्ता आणि सामाजिक जाणीवेची जोपासना करावी असे मार्गदर्शन केले. त्यांनी आधुनिक युगातील डिजिटलायझेशनच्या महत्त्वावर भर दिला आणि ग्रामीण भागातील लोकांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून समाजहित साधावे, असे प्रतिपादन केले. ग्रामीण विद्यार्थी, महिला आणि पुरुष सध्या स्मार्टफोनसारखी साधने वापरत असले तरी त्याचा रचनात्मक वापर व सामाजिक प्रगतीसाठीचा उपयोग अधिक गरजेचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. बी. एल. घायाळ यांनी एनएसएस स्वयंसेवकांना आत्मचिंतन, सामाजिक बांधिलकी, जबाबदारी आणि ग्रामीण जीवनाशी समरस होण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांनी गावातील समस्या समजून घेत त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा, ग्रामस्थांशी सुसंवाद साधावा आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून गावाच्या विकासासाठी कार्य करावे, असे आवाहन केले. शहरी आणि ग्रामीण समाजातील अंतर कमी करून एकमेकांशी समरसता साधणं ही काळाची गरज असल्याचं त्यांनी ठामपणे सांगितलं.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. भागवत पस्तापुरे यांनी केले, तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ. विशाल मस्के यांनी केले. संपूर्ण उद्घाटन सोहळा प्रेरणादायी ठरला असून शिबिराच्या पुढील दिवसांत गाव स्वच्छता, आरोग्य तपासणी, लोकजागृती मोहिमा, व्याख्याने आणि विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

शिबिराचे औपचारिक उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले स्वागत व प्रास्ताविकानंतर शिबिराचे उद्दिष्ट स्पष्ट करण्यात आले..




*रक्तदान शिबिर श्री गुरु गोविंदसिंह रक्तपेढी येथील आरोग्य अधिकारीरक्तदान करताना प्रा. विशाल मस्के, प्रा डॉ.भागवत ना पस्तापूरे, प्रा. सुशांत बोलवार पाठीमागे उभे डॉ कनकदंडे,डॉ. आपस्तंभ प्रा बश्वेश्वर जाकोरे डॉ. अमोल काळे श्री.राहुल कांबळे आणि प्रा डॉ.काझी मॅडम्व*

**कार्यक्रम: रक्तदान शिबिर**

श्री गुरु गोविंदसिंह रक्तपेढी येथीलआरोग्य अधिकारी डॉ. कनकदंडे व सहयोगी राहुल कांबळे यांच्या उपस्थितीमध्ये रक्तादान शिबीर संपन्न झाले.**50** हून अधिक स्वयंसेवक व ग्रामस्थांनी रक्तदान केले.स्थानिक रक्तपेढी व उद्दिष्ट: सामाजिक बांधिलकीची भावना वृद्धिंगत करणे.

मुख्य उपस्थित: प्रा. डॉ. भागवत प्रस्तापुरे, विभाग प्रमुख, विशाल मस्के इत्यादी.

**दुपारचे सत्र: डिजिटल भारत**

विषय: *"डिजिटल भारत व युवकांची भूमिका"*

उद्बोधन: प्रा. भागवत प्रस्तापुरे व श्री. विशाल मस्के

डिजिटल साक्षरतेचे महत्व, UPI व्यवहार, डिजी लॉकर, ई-गव्हर्नन्स, सायबर सुरक्षेचे नियम समजावून सांगितले.

प्रभाव: युवकांनी डिजिटल यंत्रणांबाबत जागरूकता मिळवली व माहितीचा योग्य वापर करण्याची प्रेरणा घेतली.

---

**दिनांक 28 जानेवारी 2025 सामाजिक समस्या जनजागृती**

- **दुपारचे सत्र:**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिरात दिनांक 28 जानेवारी 2025 रोजी **"बालविवाह एक सामाजिक समस्या"** या विषयावर विशेष जागृतीपर कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. ए. टी. शिंदे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. शंकर विभुते आणि प्रा. डॉ. एन. के. वाघमारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विशेष मार्गदर्शक म्हणून देखील अध्यक्ष प्रा. डॉ. ए. टी. शिंदे यांनी सखोल विचार मांडले.

वक्त्यांनी बालविवाह या गंभीर सामाजिक समस्येचा विविध पैलूंनी मागोवा घेतला. त्यांनी बालविवाहामुळे मुला-मुलींच्या शिक्षणात येणाऱ्या अडथळ्यांचा, त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा, आणि समाजाच्या एकूणच प्रगतीवर पडणाऱ्या नकारात्मक परिणामांचा तपशीलवार ऊहापोह केला. त्यांनी हेही स्पष्ट केले की बालविवाह हा केवळ एक वैयक्तिक प्रश्न नसून तो सामाजिक शोषणाची पद्धत बनला आहे.

डॉ. शिंदे यांनी आपल्या विशेष मार्गदर्शनात ग्रामीण समाजात आजही अस्तित्वात असलेल्या या प्रथेमागील परंपरा, अज्ञान आणि सामाजिक दबाव यांवर भाष्य करत, युवकांनी या विषयी जनजागृती करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. भागवत पस्तापूरे यांनी तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विशाल मस्के यांनी केले. यावेळी मौजे वरखेड येथील ग्रामस्थ आणि शिबिरातील सर्व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपानंतर राष्ट्रगीत गायन करण्यात आले.

कार्यक्रमाचा मुख्य परिणाम म्हणजे स्वयंसेवक आणि उपस्थित युवक-युवतींनी बालविवाहासारख्या प्रथेविरोधात सजग आणि सक्रिय भूमिका घेण्याचा संकल्प केला. त्यांनी आपल्या परिसरात याबाबत

जागरूकता निर्माण करण्याची तयारी दर्शवली. हा कार्यक्रम केवळ शैक्षणिक स्वरूपाचा नसून सामाजिक बदलासाठी दिशा देणारा ठरला.




*शिबीरा दरम्यान स्वयंसेवकांना मार्गदर्शनापूर्वी प्रा. डॉ. ए.टी. शिंदे यांचा सत्कार करताना प्रा.डॉ. मिलींद लोखंडे बाजुला उपस्थित प्रा. डॉ.राम मेटकर प्रा.डॉ. दिलीप काठोडे प्रा.डॉ.भागवत पस्तापूरेप्रा.डॉ. विशाल मस्के*

---

## दिनांक 29 जानेवारी 2025 - आरोग्य तपासणी व सायबर सुरक्षा

- **सकाळचे सत्र**:

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिनांक 29 जानेवारी 2025 रोजी मौजे वरखेड येथे श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिरांतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात ***MGM आयुर्वेदिक रुग्णालय, निमगाव*** यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या आरोग्य शिबिरामध्ये हृदयविकार, उच्च व निम्न रक्तदाब, मधुमेह, अस्थिरोग तसेच महिलांच्या आरोग्यविषयक विशेष तपासण्या करण्यात आल्या. डॉक्टर पावडे आणि त्यांच्या सहकारी वैद्यकीय टीमने सुमारे 120 हून अधिक रुग्णांची तपासणी करून त्यांना विनामूल्य औषधे व तज्ज्ञ सल्ला उपलब्ध करून दिला. शिबिरामुळे गावातील अनेक शेतकरी व गृहिणींना आपल्या आरोग्याबाबत योग्य निदान व सल्ला घेता आला. विशेषतः अशा नागरिकांना याचा विशेष फायदा झाला की जे शेतीच्या कामामुळे बाहेर गावी जाऊ शकत नाहीत. आयुर्वेदिक उपचार पद्धतीमुळेही ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.या उपक्रमामुळे ग्रामस्थांनी आनंद आणि कृतज्ञता व्यक्त करत महाविद्यालयाच्या वतीने तसेच ग्रामस्थांच्या वतीने डॉक्टर पावडे व त्यांच्या संपूर्ण वैद्यकीय पथकाचा छोटेखानी सत्कार करण्यात आला.संपूर्ण तपासणी शिबिर अत्यंत यशस्वीपणे पार पडले एमजीएम रुग्णालयाचे **वैद्यकीय अधिकारी डॉक्टर पावडे** व त्यांचा सर्व समूह यांनी खुप मेहनत घेवून मोलाचे सहकार्य केलेआणि या उपक्रमामुळे शिबिरातील स्वयंसेवक व ग्रामस्थांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली. हा उपक्रम आरोग्यसेवा आणि समाजहिताचा उत्कृष्ट नमुना ठरला.

- **दुपारचे सत्र:**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात ***"ऑनलाइन पेमेंट - फायदे, धोके व सुरक्षा"*** या विषयावर मार्गदर्शन मौजे वरखेड येथे सुरू असलेल्या श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात दिनांक 30 जानेवारी 2025 रोजी "ऑनलाइन पेमेंट - फायदे, धोके व सुरक्षा" या अत्यंत महत्त्वाच्या आणि काळानुरूप विषयावर प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या **अध्यक्षस्थानी डॉ. एल. टी. काळे** हे होते, तर विशेष वक्ते म्हणून समाजकार्य महाविद्यालयाचे **डॉ. दिलीप काठोडे** यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी डिजिटल व्यवहार करताना येणाऱ्या संधी व अडचणी यांचा वेध घेत सुरक्षित ऑनलाईन व्यवहार कसा करावा याविषयी महत्वपूर्ण मुद्दे विशद केले. त्यांच्या मार्गदर्शनातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे होतेऑनलाइन पेमेंटचे फायदे: वेग, सुलभता, वेळेची बचत, रोख रकमेची आवश्यकता टळणे.डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी: अनोळखी लिंकवर क्लिक न करणे, खाजगी माहिती शेअर न करणे.OTP फसवणूक: अनोळखी व्यक्तींना ओटीपी, पिन, CVV शेअर केल्यास काय धोके होऊ शकतात याची सविस्तर माहिती.सायबर गुन्ह्यांपासून बचाव: सायबर क्राइमचे प्रकार, त्याची उदाहरणे, आणि अशा गुन्ह्यांची तक्रार कुठे व कशी करावी यावर माहिती.सुरक्षित व्यवहारासाठी सूचना: अधिकृत ॲपचा वापर, नियमित पासवर्ड बदलणे, टू-फॅक्टर ऑथेंटिकेशनचा वापर.

या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. भागवत पस्तापूरे यांनी तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विशाल मस्के यांनी केले.या कार्यक्रमात मौजे वरखेड येथील ग्रामस्थ आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.कार्यक्रमाचा सकारात्मक प्रभाव म्हणून अनेक युवकांनी सायबर जागरूकता अंगीकारण्याचा संकल्प केला. हा उपक्रम डिजिटल युगातील सुरक्षिततेचा संदेश देणारा व युवकांना सजग बनवणारा ठरला.




**शिबिर स्थळी विद्यार्थ्यांना ऑनलाईन पेमेंट या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रो.डॉ. लक्ष्मण काळे व डॉ. दिलीप काठोडे व इतर सहकारी**

दिनांक 30 जानेवारी 2025 - महिला सशक्तीकरण व जैवतंत्रज्ञान

सकाळचे सत्र - महिला मेळावा:

ग्रामीण महिलांसाठी सशक्त संवादाचे व्यासपीठ

दिनांक 30 जानेवारी 2025 रोजी मौजे वरखेड येथे इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिरात "महिला मेळावा" या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.या मेळाव्याचे आयोजन प्रा. रंजना अडकिने यांच्या पुढाकाराने आणि महाविद्यालयातील सर्व महिला प्राध्यापकांच्या सहकार्याने करण्यात आले. यामध्ये प्रा. कविता भोसले, डॉ. मंजुषा कोल्हे, प्रा. संध्या आढाव व प्रा. काकडे मॅडम यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आणि महिलांना मार्गदर्शन केले.प्राध्यापकांनी गावातील महिलांशी थेट संवाद साधत त्यांचे प्रश्न ऐकले, समाधानकारक उत्तरे दिली, कर्तव्याची जाणीव निर्माण करून दिली आणि एक सामाजिक सलोखा घडवला. या माध्यमातून ग्रामस्थ महिला महाविद्यालयाशी जोडल्या गेल्या.

कार्यक्रमात महिलांच्या समस्या, निर्णय प्रक्रियेतील सहभाग, स्वयंपूर्णता, मुलींचे शिक्षण, आरोग्य व हक्क यासारख्या विषयांवर सखोल चर्चा झाली. यामध्ये स्वयंसेविकांनीही सक्रिय सहभाग घेत महिलांना प्रेरित केले.

प्रभाव: या मेळाव्यामुळे महिलांमध्ये आत्मभान, संघटनशक्ती आणि जागरूकता वाढीस लागली. हा उपक्रम ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणासाठी एक प्रभावी पाऊल ठरला.




*महिला मेळाव्या दरम्यान गावातील महिला व विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतेवेळी डॉ. रंजना अडकिने व इतर सहकारी*

- ***दुपारचे सत्र - जैवतंत्रज्ञान व शेती:***



वरखेड येथील शेतकऱ्यांना कृषी विषयक मार्गदर्शन करताना प्राध्यापक हनुमंत भोपाळे व इतर सर्व सहकारी

**जैवतंत्रज्ञान शेतीसाठी फायद्याचे"**

दिनांक 30 जानेवारी 2025रोजी इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको येथे "जैवतंत्रज्ञान शेतीसाठी फायद्याचे" या विषयावर एक महत्वाचे मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. यामध्ये शेतीतज्ज्ञ **डॉ. धनंजय गोंड, प्राध्यापक डॉ. हनुमंत भोपाळे (कृषी विश्लेषक, इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको),** आणि डॉ. एफ.एम. सौदागर (राज्यशास्त्र विभाग, इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय) उपस्थित होते.**कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. एफ.एम. सौदागर** यांच्या अध्यक्षतेखाली झाले. शिबिरात, शेतकऱ्यांना शेतीतले नवीन तंत्रज्ञान आणि त्याचा लाभ याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः डॉ. धनंजय गोंड आणि डॉ. हनुमंत भोपाळे यांनी जैवतंत्रज्ञानाच्या मदतीने शेतीतील उत्पादकता आणि किफायत वाढवण्यावर सखोल मार्गदर्शन केले.

जैवतंत्रज्ञानाच्या फायद्यांचे सखोल विश्लेषण:

डॉ. धनंजय गोंड यांनी आपल्या सत्रात शेतकऱ्यांना जैवतंत्रज्ञान (Bio-Technology) आणि सेंद्रिय शेती याचे महत्त्व सांगितले. ते म्हणाले, "सेंद्रिय शेती पद्धतीमध्ये रासायनिक खतांचा वापर कमी करून नैतिक आणि पर्यावरणानुकूल उत्पादन मिळवता येते. यामुळे मातीचा दर्जा वाढतो, जलस्रोतांचा वापर कमी होतो आणि उत्पादने अधिक टिकाऊ बनतात." त्याचप्रमाणे, पीक संरक्षण आणि सुधारित वाण यावर सुद्धा त्यांचे मार्गदर्शन होतं. त्यांचा म्हणावा असे की, "सुधारित वाण अधिक उत्पादनक्षम असतात, आणि पिकांची रोगप्रतिबंधक क्षमता सुधारणे हे जैवतंत्रज्ञानामुळे शक्य होऊ शकते."त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले की तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे खर्च कमी होतो आणि उत्पादन अधिक होऊ शकते, तसेच हे उत्पादन पिकाच्या दर्जात सुधारणा करतो. पीक सुरक्षा, बियाणांचे सुधारित वाण, आणि जैविक कीटकनाशकांचे वापर यामधून शेतकऱ्यांना अधिक नफा मिळवता येईल.

डॉ. हनुमंत भोपाळे यांचे मार्गदर्शन:

डॉ. हनुमंत भोपाळे यांनी आपल्या भाषणात, बाजारपेठेचा अभ्यास आणि पीक व्यवस्थापनाचे महत्व सांगितले. ते म्हणाले, "शेती करताना केवळ उत्पादनावर लक्ष केंद्रित करणे पुरेसे नाही. शेतकऱ्यांनी बाजारपेठेचा अभ्यास करणे, आपले उत्पादन योग्य प्रकारे विक्रीसाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे."

ते म्हणाले की, "शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कृषी कर्ज, बीमा योजना आणि विक्रीसाठी योग्य पद्धतींचा वापर करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वृद्धी केली जाऊ शकते."

त्यांनी पुढे सांगितले की, जैवतंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांचे पीक संरक्षण, तंत्रज्ञानाने सुधारित वाणांचा वापर, आणि बाजाराच्या मागणीशी जुळवून शेती करणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना अधिक नफा मिळवता येईल.

प्रभाव:

या मार्गदर्शन शिबिरामुळे ग्रामस्थ आणि विद्यार्थी शेतीतले नवीन तंत्रज्ञान अधिक समजून घेतले. यामुळे त्यांना जैवतंत्रज्ञानाचे महत्त्व आणि शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यावर अधिक विश्वास बसला. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांची विक्री अधिक योग्य पद्धतीने कशी करावी, तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्पादनात कसा सुधारणा करावी, याबद्दल माहिती मिळाली.

समारोप: या शिबिरामुळे शेतकऱ्यांमध्ये जैवतंत्रज्ञानावर विश्वास आणि जागरूकता वाढली. शेतकऱ्यांनी या शिबिरातील मार्गदर्शनाचे पालन करणे सुरू केले तर शेतीतील उत्पादन आणि नफा दोन्ही वाढू शकतात.या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. भागवत पस्तापूरे यांनी तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विशाल मस्के यांनी केले.

**दिनांक 31 जानेवारी 2025 - योग दिन व संविधान जागरूकता**

**सकाळचे सत्र - योग प्रात्यक्षिके:**

"शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योगाभ्यास" दिनांक 31 जानेवारी 2025 रोजी इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको येथे "शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योगाभ्यास" या विषयावर एक महत्वपूर्ण मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले या सत्राचे .मार्गदर्शन योगशिक्षक अर्जुन शिंदे यांनी केले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना प्राणायाम, ध्यान, सूर्यनमस्कार, आणि विश्रांती क्रिया यांचा प्रात्यक्षिकद्वारे परिचय करून दिला.सत्राचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक आणि मानसिक आरोग्याची जाणीव निर्माण करणे होते. योगशिक्षक अर्जुन शिंदे यांनी विद्यार्थ्यांना योगाभ्यासाचे महत्व समजावले आणि विविध योगासनांचे सादरीकरण केले.प्राणायाम आणि ध्यान यांची सैद्धांतिक माहिती सुद्धा दिली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक शांती आणि ताणमुक्त जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन मिळाले. सूर्यनमस्कार आणि विश्रांती क्रिया यांचा प्रत्यक्ष प्रात्यक्षिकानुसार विद्यार्थ्यांना कसा लाभ होऊ शकतो, यावर विस्तृत माहिती दिली.

- प्रभाव:
- या सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाभ्यास आणि शारीरिक व मानसिक आरोग्य याबद्दल एक प्रबळ उत्साह निर्माण झाला शारीरिक आणि मानसिक ताणमुक्त जीवनासाठी योगाचे महत्व अधिक समजून घेतले.या सत्रामुळे विद्यार्थ्यांना आपल्या शरीर आणि मनाची काळजी घेण्याचे महत्त्व समजले आणि ते त्यांचा दैनंदिन जीवनशैलीत अधिक सक्रियपणे समाविष्ट करणार आहेत.



शिबिर स्थळी विद्यार्थ्यांना योग व प्राणायाम प्रात्यक्षिक करून घेताना प्राध्यापक शिंदे

**दुपारचे सत्र - भारतीय संविधानाचे अवलोकन"**

दिनांक 31 जानेवारी 2025 रोजी इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको येथे एक महत्त्वपूर्ण सत्र आयोजित करण्यात आले, ज्याचे शीर्षक "भारतीय संविधानाचे अवलोकन" होते. या सत्रात **डॉ. विजय पवार (बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा) आणि प्रा. संदीप काळे (प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड)** हे प्रमुख वक्ते होते, तर अध्यक्ष म्हणून डॉ. सुनील डहाळे (एमजीएम महाविद्यालय, नांदेड) उपस्थित होते.सत्राची प्रमुख मुद्दे:

संविधानाचा इतिहास:

डॉ. विजय पवार यांनी भारतीय संविधानाचा इतिहास, त्याच्या निर्माण प्रक्रियेतील विविध टप्पे आणि त्यावेळीच्या महत्वाच्या घटनांवर सखोल चर्चा केली. त्यांनी संविधानाच्या निर्मितीचे कारणे स्पष्ट केली, तसेच त्यातील प्रमुख घटकांचे आणि तत्वांचे महत्त्व सांगितले.प्रा. संदीप काळे यांनी संविधानाच्या शास्त्रीय दृष्टिकोनावर विचार मांडले आणि त्याच्या स्थापनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावली.

घटक आणि मुल्ये: भारतीय संविधानाचे घटक म्हणजे त्याचे विविध भाग, जसे की उद्देशिका, मूलभूत हक्क, कर्तव्ये, पद्धती आणि इतर बाबी.

संविधानातील मूल्ये ही अत्यंत महत्त्वाची आहेत. संविधानाच्या तत्वज्ञानात समाविष्ट असलेल्या मूल्यांमध्ये समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि समता या घटकांचा समावेश आहे

नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये:

डॉ. विजय पवार यांनी संविधानातील मुलभूत हक्कांचे विश्लेषण केले आणि प्रत्येक नागरिकाला त्याचे हक्क कसे मिळवता येतात हे सांगितले. नागरिकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव होणे अत्यंत

आवश्यक आहे



शिबीर स्थळी संवेधानावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना डॉ. विजय पवार व उपस्थित डॉ. संदीप काळे, प्रा. डॉ. एफ. एम सौदागर, प्रा. डॉ. विशाल मस्के कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजकुमार पवळे.

प्रा. संदीप काळे यांनी नागरिकांच्या कर्तव्यांबद्दल चर्चा केली, त्यात समाजातील प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आणि संविधानाचे पालन करण्याची आवश्यकता स्पष्ट केली.

लोकशाही प्रक्रियेतील सहभाग:

डॉ. विजय पवार यांनी लोकशाही प्रक्रियेतील नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले. लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाने आपला मताचा अधिकार वापरणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी मतदान प्रक्रिया, शासनाच्या कार्यपद्धती आणि लोकप्रतिनिधींची निवड यावर मार्गदर्शन केलेप्रा. संदीप काळे यांनी या संदर्भात नागरिकांच्या सशक्त भागीदारीच्या महत्त्वावर बल देऊन लोकशाहीतील एकाग्रतेची आवश्यकता सांगितली.



शिबीर स्थळी संवेधानावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजकुमार पवळे.

सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन:







कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विशाल मस्के यांनी केले. सत्राच्या समारोपात, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाचे अधिकारी प्रा. डॉ. भागवत पस्तापूरे यांनी आभार प्रदर्शन केले. प्रभाव:या सत्रामुळे युवकांमध्ये राज्यघटनेबाबत अभिमान आणि जबाबदारीची भावना निर्माण झाली. भारतीय संविधानाची माहिती आणि त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजले आणि संविधानातील तत्वज्ञानाचे पालन करण्याचा ठरवला. विशेषत: लोकशाही प्रक्रियेत सहभाग आणि नागरिक अधिकारांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये जागरूकतेला चालना देणारी ठरली.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गाऊन केली गेली. **दिनांक . 01 फेब्रुवारी 2025** रोजी इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको येथे सात दिवशीय विशेष वार्षिक शिबिर समारोप समारंभ आयोजित करण्यात आला. या शिबिराचे समारोप बी. एल.

घायाळ (प्रमुख वक्ते), डॉ. शिवराज देशमुख, आणि डॉ. केदार सोळुंके यांनी केले. समारोप सत्रामध्ये डॉ. घायाळ यांनी विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले आणि शिबिराच्या संपूर्ण कार्याची समीक्षा केली.
डॉ. घायाळ यांनी शिबिरात विद्यार्थ्यांनी केलेल्या समाजकार्याचा आढावा घेतला आणि त्याचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी शिबिरादरम्यान ग्रामस्थांसोबत सुसंवाद साधला, विविध शैक्षणिक व सामाजिक कार्ये केली आणि या कार्यामुळे ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.
शिबिरातील विद्यार्थ्यांच्या कामाची महती आणि त्यातील सहभागीतेचे महत्व स्पष्ट करून समाजातील योगदानाची भावना विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.
डॉ. शिवराज देशमुख आणि डॉ. केदार सोळुंके यांनी समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांना समाज सेवा आणि विकसनशीलतेतील भूमिका बद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी शिबिराच्या समारोपाचे महत्व सांगितले आणि विद्यार्थ्यांच्या कार्यामध्ये केलेल्या सकारात्मक बदलांवर चर्चा केली.
प्राचार्य बी. एल. घायाळ यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याबद्दल ग्रामस्थांकडून मिळालेल्या समाधान चे वर्णन केले आणि सर्व विद्यार्थ्यांचा गौरव केला.
प्रभाव:
या सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवा आणि कार्यप्रतिक्रिया यावर जागरूकता निर्माण झाली. शिबिरातील कार्यामुळे विद्यार्थ्यांना समाजातील योगदानाची जाणीव होणारी ठरली आणि ग्रामस्थांच्या चांगल्या प्रतिसादामुळे विद्यार्थ्यांमध्ये अधिक प्रेरणा निर्माण झाली.
कार्यक्रमाच्या सांगतेला राष्ट्रगीत गायन करण्यात आले, ज्यामुळे शिबिराचा समारोप उत्साही आणि समाजदायित्वाची भावना निर्माण करणारा ठरला.




**शिबिराच्या समारोप प्रसंगी डावीकडून प्रा. डॉ. काझी मॅडम प्रा. डॉ. सुनिल उहाळे प्रा. अपस्तंभ प्रा. डॉ.भागवत पस्तापुरे, प्रा. डॉ. विशाल मस्के, प्राचार्य प्रा. डॉ. बी.एल. घायळ,प्रा. डॉ. केदार सोळंके ग्रंथपाल प्रा. डॉ.शिवराज देशमुख प्रा.सुशांत बोलवार आणि श्री.मनोज पवार**

:






दररोज शिबिराच्या सकाळच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या ठिकाणची स्वच्छता केली ते क्षणचित्रे













Nss camp varkhed
Cleanliness programme 🌹 🪴

11:48





**शिबिराच्या समारोप प्रसंगी व्यसनमुक्ती आणि हुंडाबंदी यावर स्वयंसेवकांनी ग्रामस्थांसमोर पथनाट्य सादर केले**

## Interim Summary

एकूण 7 दिवसांच्या शिबिरात सामाजिक जागरूकता, आरोग्य, शेती, डिजिटल साक्षरता, महिला सक्षमीकरण, संविधान जागृती, आणि योग साधना अशा विविध विषयांवर कार्यक्रम घेण्यात आले. विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व तांत्रिक विषयांवर भर देण्यात आला.ग्रामस्थ, स्वयंसेवक व प्रमुख वक्त्यांचा प्रभावी सहभाग हे शिबिराचे बलस्थान ठरले.युवकांमध्ये सामाजिक प्रश्नांविषयी संवेदनशीलता वाढविणे व कृतीशीलतेकडे वळविणे हे उद्दिष्ट यशस्वीरीत्या पार पाडले गेले.ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग आणि विद्यार्थ्यांचे समर्पित योगदान हे या शिबिराचे यश ठरले.स्वयंसेवकांनी नेतृत्व, सेवा, संवाद कौशल्य, आणि सामाजिक बांधिलकी या गुणांचा विकास केला.

Dr. Mirza S.B.
Director
Internal Quality Assurance Cell
Indira Gandhi (Sr.) College,
CIDCO,New Nanded. (M.S.)

Indira Gandhi (Sr.) College
Principal
CIDCO, New Nanded. (M.S.)

Principal
Indira Gandhi Sr. College
CIDCO, NEW NANDED.

**Dr. Vishal B. Maske**
**NSS. Program Officer**
**Indira Gandhi Senior College CIDCO Nanded**

**Dr. Bhagwat N. Pastapure**
**NSS. Program Officer**
**Indira Gandhi Senior College CIDCO Nanded**

दैनिक
निर्भिड व धडक बातम्यांसाठी
विष्णुपूरी एक्सप्रेस
दि.30 जानेवारी 2025 गुरुवार

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिराचे उद्घाटन

**नांदेड/प्रतिनिधी**

इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको व एम.जी.एम. कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड आय.टी, नांदेड यांचे वरखेड तालुका जिल्हा नांदेड येथे 26 जानेवारी 2025 ते 01 फेब्रुवारी 2025 या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर संपन्न होत आहे.

त्यातील आजच्या विशेष वार्षिक शिबिराचे उद्घाटन वरखेड येथे थाटामाटात पार पडले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एल. घायाळ होते, तर उद्घाटक प्रा. डॉ. अमोल काळे उपस्थित होते. पोलीस पाटील श्री. सुभाष नागोराव सुर्यवंशी यांची विशेष उपस्थिती लाभली.तसेच सूर्य कांत सूर्यवंशी,चंपतराव सुर्य वंशी, मुख्याध्यापक पाटील सर डॉ. एल. टी. काळे, डॉ. कनकदंडे यांची उपस्थिती होती. उद्घाट नाच्या सुरुवातीला एन.एस.एस. गीताने कार्यक्र माला सुरुवात झाली. प्रास्तावि कामध्ये डॉ. भागवत पस्तापुरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकत शिबिराचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.



प्रा. डॉ. राष्ट्रीय सेवा योजनेचे नांदेड जिल्हा समन्वयक डॉ. अमोल काळे यांनी विशेष वार्षिक शिबिरादरम्यान विद्या र्थ्यांना मार्गदर्शन करताना डिजि टल इंडिया आणि डिजिटल साक्षरतेचे महत्त्व यावर भर दिला.ते म्हणाले की, डिजिटल साक्षरता ही आजच्या काळाची गरज असून, तिच्याशिवाय प्रगती शक्य नाही. डिजिटल इंडियाच्या माध्यमातून देशा तील ग्रामीण व शहरी भागांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रसार होत आहे. विद्यार्थ्यांनी इंटरनेट, मोबाईल ॲप्स, ऑनलाइन शिक्षण प्लॅट फॉर्म्स आणि डिजि टल बँकिंग यांचा योग्य वापर करून आपले ज्ञान वाढवावे. त्यांनी डिजिटल साक्षरतेचे फायदे सांगताना असे नमूद केले की, यामुळे शिक्षण, आरोग्यसेवा, रोजगार संधी, आणि प्रशासनाशी संपर्क साधणे सोपे झाले आहे. ग्रामीण भागातही डिजिटल साक्षर तेमुळे महिला सक्षमीकरणाला गती मिळत आहे.विद्यार्थ्यांनी डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवण्याची जबाबदारी घेतली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गद र्शनाने विद्यार्थ्यांना डिजिटल युगाचे महत्त्व पटले आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रेरणा मिळाली.यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी. एल. घायाळ यांनी विद्यार्थ्यांना समाजोपयोगी उप क्रमांमध्ये सक्रिय सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. उप स्थित मान्यवरांचे शाल आणि पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. चंपतराव सूर्य वंशी यांनी विद्यार्थ्यांना गावातील विकासका मांमध्ये योगदान देण्याचे आवाहन केले. आणि पोलीस पाटील श्री. सुभाष नागोराव सुर्यवंशी यांनीही आप ल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्र गीताने करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या या विशेष शिबिरामुळे विद्यार्थ्यांना समाजा च्या समस्यांचे आकलन करून त्या सोडवण्याचे शिक्षण मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. आणि इथून पुढे सहा दिवस राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जाणार आहेत त्यामध्ये रक्तदान शिबिर, आरोग्य तपा सणी शिबिर, महिला मेळावा, योगा आणि शिवाय डिजिटल भारत व आजचा युवक बाल विवाह: एक सामाजिक समस्या ,ऑनलाइन पेमेंट सुरक्षा व धोके, जैवतंत्रज्ञान शेतीसाठी फायद्याचे की तोट्याचे भारतीय संविधान: एक अवलोकन अशा विविध विषयावर मान्यवरांची व्याख्यान होणार आहे तसेच स्कूल कनेक्ट रॅली व चावडी वाचन असे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. कार्यक्र माच्या यशस्वीतेसाठी डॉ.विशाल मस्के यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील डहाळे यांनी केले तर आभार डॉ. सुशांत बोलवार यांनी मांडले.